
Shivaji College Hingoli Dist.

# भारतातील राजकीय व सामाजिक चळवळी

मुख्य संपादक
प्राचार्य. डॉ. आय. डी. पाटील
संपादक
प्रा. डॉ. आर. एन. शेवाळे
प्रा. पी. एम. सोनवणे



अथर्व पब्लिकेशन्स्

PRINCIPAL
Shivaji College
Hingoli, Dist. Hingoli

Scanned with OKEN Scanner

Shivaji College • Hingoli • Dist Hingoli

अथर्व पब्लिकेशन्स

भारतातील राजकीय व सामाजिक चळवळी
Political and Social Movements in India

© सर्व हक्क

ISBN 13 : 978-93-88544-74-0
पुस्तक प्रकाशन क्र. ६८३

**प्रकाशक**
युवराज भटू माळी

**अथर्व पब्लिकेशन्स**
**धुळे :** १७, देवीदास कॉलनी, वरखेडी रोड, धुळे ४२४००१.
**संपर्क :** ९४०५२०६२३०
**जळगाव :** तळमजला, ओम हॉस्पिटल, अँग्लो उर्दू हायस्कूलजवळ, ढाके कॉलनी,
जळगाव ४२५००१. **संपर्क :** ०२५७-२२३९६६६, ९७६४६९४७९७
**ई-मेल :** atharvapublications@gmail.com
**वेबसाईट :** www.atharvapublications.com

**प्रथमावृत्ती :** १०/०८/२०१९
**अक्षरजुळवणी :** अथर्व पब्लिकेशन्स

**मूल्य :** ₹ ९९५/-

---

*विद्याभारती शैक्षणिक मंडळ अमरावती संचलित संत मुक्ताबाई कला आणि वाणिज्य महाविद्यालय, मुक्ताईनगर येथे दिनांक १०/०८/२०१९ रोजी झालेल्या एकदिवसीय राष्टीय चर्चासत्रातील निवडक लेख*

*या पुस्तकात समाविष्ट लेखांचे हक्क ज्या-त्या लेखकाकडे असून त्यांच्या मताशी मुख्य संपादक, संपादक मंडळ, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. सर्व हक्क राखून ठेवली आहेत.*

---

PRINCIPAL
Shivaji College
Hingoli. Dist. Hingoli



Scanned with OKEN Scanner

Shivaji College Hingoli Dist Hingoli


- स्त्रीवादी चळवळ ........................................ [illegible]
  – प्रा. डॉ. अलका काशिराव जाधव, मलकापूर
- भारतातील स्त्रीवादी चळवळ ........................................ [illegible]
  – प्रा. डॉ. शुभांगी दिनेश राठी, भुसावळ
- महिला बचत गट : महिला सक्षमीकरणाची चळवळ ........ [illegible]
  – डॉ. रामचंद्र जे. गायकवाड, अर्जापूर, जि. नांदेड
- भारतातील स्त्रीवादी चळवळीची वाटचाल .................. [illegible]
  – प्रा. डॉ. कल्पना आर. टेकाडे, नागपूर
- महिला चळवळीपुढील आव्हाने व उपाययोजना ............ १२१
  – सहा. प्राध्या. बोयेवार यादव बाबुराव, दोंडाईचा
- स्त्रीवादी चळवळ ........................................ १२६
  – निकिता अनिल शेंडगे, पुणे
- स्त्रीमुक्ती चळवळ आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर ........ १३१
  – प्रा. डॉ. रत्ना लाला जवरास, बोदवड
- महिला सबलीकरण चळवळ – एक अध्ययन ............ १३७
  – डॉ. सुखनंदन ढाले, हिंगोली
- डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि स्त्रीविषयक चळवळ ...... १४६
  – प्रा. डॉ. संदीप कडू माळी, मुक्ताईनगर
- स्त्री चळवळीचा उदय ........................................ १५०
  – प्रा. हंगरगेकर विठ्ठल निवृत्तीराव, हनेगाव, जि. नांदेड
- स्त्रीवादी इतिहासलेखन ........................................ १५५
  – वळवी विश्वास गोरखनाथ, जळगाव
- स्त्रीवादी चळवळ आणि विज्ञान साहित्य .................. १६१
  – प्रा. डॉ. वंदना लव्हाळे, मुक्ताईनगर
- राष्ट्रीय महिला आयोग आणि स्त्री विकास .................. १६७
  – प्रा.डॉ.मानवते उत्तम हुसनाजी, हनेगाव जि.नांदेड
- आदिवासी स्त्री चळवळीत कॉ. नजूबाई गावित यांचे योगदान ............ १७१
  – शंकर दिलीप यशोद, अमळनेर
  – प्रा.डॉ. धनंजय रमाकांत चौधरी, अमळनेर


PRINCIPAL
Shivaji College
Hingoli. Dist. Hingoli

Scanned with OKEN Scanner

Shivaji College Dist Hingoli Hingoli

# महिला सबलीकरण चळवळ - एक अध्ययन

डॉ. सुखनंदन ढाले
राज्यशास्त्र विभाग प्रमुख, शिवाजी महाविद्यालय, हिंगोली

**प्रस्तावना**

महिला सबलीकरणाची प्रक्रिया ही विसाव्या शतकात गतिमान बनली असली तरी या प्रक्रियेची सुरूवात काही शतकापुर्वी झाली आहे. अमेरिकन स्वातंत्र्याचा जाहीरनामा आणि फ्रेंच व्यक्तिस्वातंत्र्याचा जाहीरनामा यामध्ये महिला सबलीकरण प्रक्रियेचे पहिले प्रतिबिंब पडल्याचे दिसते. या दोन्ही जाहीरनाम्यामध्ये स्त्री आणि पुरूषासाठी समान अधिकाराची तरतुद करण्यात आलेली आहे. १८ व्या शतकामध्ये साहित्यकृती मधून महिला अधिकाराचा पुरस्कार केला. सन १७९२ मध्ये प्रकाशित झालेले मेरी वुलस्टोन क्राफ्टचे ''व्हिन्डीकेशन ऑफ द राईटस ऑफ वुमेन'' हे पुस्तक म्हणजे महिला सबलीकरणाचा पुरस्कार करणारी पहिली साहित्यकृती. एकोणिसाव्या शतकामध्ये कॅडी स्टॅनहोन, विल्यम थॉम्पसन, हॅरियट टेलर, जॉन स्टूअर्ट मिल यासारख्या साहित्यिकांनी, विचारवंतानी स्त्री मुक्तीचा विचार तत्कालीन समाजामध्ये रूजवण्याचा प्रयत्न केला.[१]

महिलांना पुरूषाच्या बरोबरीने राजकीय अधिकार विशेषत: मतदानाचा अधिकार मिळावा यासाठी एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धापासून चळवळी सुरू झाल्या. महिलांना मतदानाचा अधिकार न्युझीलँडमध्ये १८९३ मध्ये मिळाला. इंग्लंडमध्ये विवाहासंबंधित कायद्यात अनेक सुधारणा करण्यात आल्या. विसाव्या शतकाच्या पहिल्या दशकात स्त्री चळवळीने चीन, इराण, जपान, कोरिया इत्यादी देशात जोर धरला. पहिल्या चार दशकात ऑस्ट्रीया, जर्मनीपासून तुर्कस्थान व ऊरूग्वे या देशात स्त्रियांना मतदानाचा अधिकार मिळाला. त्याच सुमारास मागरिट संगेर यांनी अमेरिकेत, ॲलन की यांनी स्वित्झलँडमध्ये व जपानमध्ये शिझू इशिमोटो हिने स्त्रियांना बाळांतपणातले अधिकार मिळावेत म्हणून चळवळी चालविल्या आहेत.[२]

भारतामध्ये १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात आणि २० व्या शतकाच्या प्रारंभी महात्मा जोतीबा फुले, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, न्यामूर्ती रानडे, गोपाळ गणेश आगरकर, महर्षी धोंडो केशव कर्वे आदी समाजसुधारकांनी स्त्रियांच्या गुलामीरीविरूद्ध आवाज उठवून महिलांना पुरूषाच्या बरोबरीने सर्वच क्षेत्रामध्ये समान अधिकाराची मागणी केली आहे.

दुसऱ्या महायुद्धानंतर आणि प्रामुख्याने १९६० च्या दशकामध्ये महिला



PRINCIPAL
Shivaji College
Hingoli. Dist. Hingoli

Scanned with OKEN Scanner

Shivaji College Hingoli Dist. Hingoli

सबलीकरणाची प्रक्रिया गतिमान झाली. महिलांच्या अधिकाराचा मुलभूत मान अधिकारामध्ये समावेश करण्यात आला. महिला सबलीकरणाची जाणीव वैश्विक बनविण्यात संयुक्त राष्ट्रसंघटनेचे योगदान महत्वपुर्ण आहे. महिलाविरूद्ध लिंगभेदावर आधारीत भेदभावाचे धोरण नष्ट होण्यासाठी सन १९७९ मध्ये International Convention on elimination of all forms of discrimination against woemn (CEDAW) हा महत्वपुर्ण ठराव संमत केला. या करारालाच आंतरराष्ट्रीय स्त्री हक्काचे विधेयक असे म्हटले जाते. या करारात स्त्री भेदभावाचे वर्णन पुढीलप्रमाणे केले आहे, लिंगआधारित व्यावर्तन, बंधन अथवा तफावत असणे ज्यामुळे स्त्रियांच्या राजकीय, आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक मुलभूत हक्कावर परिणाम होईल. त्या सर्व क्रियांना भेदभाव म्हणावे. संयुक्त राष्ट्रसंघाच्या आमसभेने १९७९ मध्ये या कराराचा स्वीकार करून ३ सप्टेंबर १९८१ रोजी हा करार कार्यान्वित केला. याचबरोबर महिला संबंधित प्रश्नाची चर्चा करण्यासाठी २००४ पर्यंत सहा आंतरराष्ट्रीय परिषदा झाल्या आहेत.३

भारतामध्ये स्वातंत्र्योत्तर काळात महिला सबलीकरणाचे प्रयत्न होत आहेत यासाठी संयुक्त अरब अमिरातने २००६ मध्ये महिलांना मर्यादित स्वरूपात मतदानाचा अधिकार दिला आहे. सामाजिक, आर्थिक, राजकीय आणि सांस्कृतिक क्षेत्रात याविषयी सातत्याने उपाययोजना केल्या जात आहे. त्यातून सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक व राजकीय क्षेत्रातील महिलांचे सबलीकरण होत आहे.

**महिला सबलीकरणाचा अर्थ**

महिला सबलीकरणाचा एक संकल्पना, प्रक्रिया आणि चळवळ म्हणून उल्लेख होतो. स्त्री अधिकाराचा पुरस्कार करणारी एक संकल्पना आहे. स्त्रियांना पुरूषांच्या बरोबरीने विकासाच्या आणि प्रगतीच्या समान संधी उपलब्ध करून देणारी ही प्रक्रिया आहे. लिंगभेदावर आधारीत विषम समाजरचना नष्ट करून स्त्री-पुरूष समानतेवर आधारीत नवी व्यवस्था निर्माण करणारी आंतरराष्ट्रीय चळवळ आहे. महिला सबलीकरणाची प्रक्रिया ही महिलांच्या विकासाशी संबंधित असणारी प्रक्रिया आहे. अबला महिलांना सबला करून त्यांना पुरूषांच्या बरोबरीने सर्वच क्षेत्रांमध्ये समान संधी उपलब्ध करून देणे हे महिला सबलीकरणाचे उद्दिष्ट आहे.

"महिला सबलीकरण म्हणजे महिलांना सबल करणारी म्हणजेच दूर्बलता नष्ट करणारी, तिच्या शरीर, मन, बुद्धीत, स्वत्वाची जाणीव व स्वतःबद्दल जागरूकता निर्माण करून त्या दृष्टिने स्वयंविकासासाठी प्रवृत्त करणारी संकल्पना होय."४

Encarta Dictionary मध्ये सबलीकरणाचा अर्थ स्पष्ट केला आहे तो



PRINCIPAL
Shivaji College
Hingoli. Dist. Hingoli

असा, "Empower meangive authority to somebody, to give somebody power or authority, inspire somebody with confidence to give somebody a sense of confidence or self esteem."५

सबलीकरणाची दुसरी व्याख्या खालीलप्रमाणे सांगता येते. "Empowerment may mean equal status to women, opportunity and freedom to develop herself."६

The Draft National Policy for Empowerment of Women - १९९६ मध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे विकासाचे मोजमाप हे महिला सबलीकरणाबाबत केलेल्या विविध प्रयत्नाद्वारे करता येते. स्त्री सबलीकरणासाठी आवश्यक घटकामध्ये आरोग्य, शिक्षण, माहिती, स्वयंविकासाकरीता आजन्म शिक्षण, व्यावसायिक कौशल्य, व्यवसाय व अर्थार्जनाची संधी, तांत्रिक सहकार्य, भूमी व इतर प्रकारची मालमत्ता, विवाहाबदल निर्णय घेण्याचा अधिकार, समान आर्थिक संसाधने, पत, तंत्रज्ञान व बाजार इत्यादीबावत समान व परिपुर्ण संधी देणे या घटकांचा समावेश होतो. सबलीकरणाबाबतच्या राष्ट्रीय धोरणात याबाबत निर्देश दिले आहेत. त्याकरिता अनेक योजनांचा व धोरणांचा यात समावेश होतो.७

**नाथ व चॅटर्जीच्या मते,** सबलीकरणासाठी विचारांवरील नियंत्रण, तत्वावरील नियंत्रण आणि आकलनशक्ती जी वैयक्तिक विश्वास किंवा श्रद्धांना, तत्वांना आणि वृत्तीला आकार देते. आकलन विचार करणे, जाणिवा आणि विश्लेषण करण्याचा मार्ग होय. हे नियंत्रण निर्णय निर्धारण शक्तीत परावर्तित होते. 'ज्यातून विविध मार्ग विस्तारतात व संसाधनावरील नियंत्रण निश्चित होते.'८

Country Report of Government of India मध्ये म्हटल्याप्रमाणे सबलीकरण म्हणजे बळजबरीने दूर्बल ठेवण्याच्या अवस्थेकडून शक्तीकडील वाटचाल होय. याद्वारे स्त्रियांमध्ये स्वतःबदलची सकारात्मक प्रतिमा निर्माण होते व त्यांच्या क्षमतेत वाढ होते.

महिला सबलीकरण म्हणजे स्त्रियांचे अध्यात्मिक, राजकीय, सामाजिक, आर्थिक सामर्थ्य वाढवणे आणि त्यांच्यामध्ये स्वतःच्या क्षमता विषयी आत्मविश्वास विकसित करणे होय.

**महिला सबलीकरणामध्ये खालील गोष्टीचा समावेश होतो.**

१) स्वतः निर्णय घेण्याचे सामर्थ्य

२) योग्य निर्णय घेण्यासाठी माहिती आणि इतर साधने वापरास उपलब्ध असणे.

३) निवड करण्यासाठी विस्तृत पर्याय असणे.

४) सामूहिक निर्णय घेतांना दृढ निश्चयाने निर्णय घेण्याची योग्यता.



Scanned with OKEN Scanner

Shivaji College Hingoli Dist. Hingoli

५) परिवर्तन घडवून आणण्याच्या योग्यतेबाबत सकारात्मक विचारसरणी

६) वैयक्तिक आणि सामूहिक सामर्थ्यामध्ये सुधारणा घडविण्याचे कौशल्य आत्मसात करण्याची योग्यता

७) अखंड आणि स्वपुरस्कृत विकास प्रक्रिया आणि परिवर्तनात सहभाग घेणे.

८) स्वत:ची सकारात्मक प्रतिमा तयार करणे आणि नकारात्मक गोष्टींवर ताबा मिळविणे.

९) लोकशाही मार्गाने इतरांचे दृष्टिकोन बदलण्याची योग्यता.[९]

**भारतातील महिला सबलीकरण**

भारतात स्त्रीमुक्ती चळवळीची सुरूवात राजा राममोहन रॉय यांच्या कार्यापासून झाली. त्यांनी स्त्री-पुरूष समता, स्त्री-शिक्षण, स्त्रीयांचे हक्क यावर भर देऊन सतीप्रथेला विरोध केला व त्यांच्या प्रयत्नामुळेच ब्रिटिश सरकारने इ.स. १८२९ मध्ये सतीप्रथा बंदी कायदा केला होता.[२] राजा राममोहन रॉय यांनी बालविवाह पद्धतीस विरोध केला होता आणि विधवा विवाहाचे समर्थन केले होते. तसेच त्यांनी बहूपत्नीत्व पद्धतीला विरोध करून स्त्रीयांचा कौटुंबिक व सामाजिक दर्जा उंचावण्यासाठी प्रयत्न केले. याच काळात १८११ मध्ये एडवर्ड मुर यांनी "हिंदू इन फार्ट साइड रे", १८१५ मध्ये जॉन फास्मेकने 'अकाउंट ऑफ द अॅबॉलिशन ऑफ फिमेल इनकरिसाइड इन गुजरात' आणि १८२९ मध्ये जेम्स रॉडने 'अॅनॅल्स अँड ऑक्सियन ऑफ राजस्थान' ही पुस्तके लिहीली आणि यामध्ये त्यांनी भारतातील लहान मुलीची हत्या व महिलांची स्थिती याविषयी गांभीर्याने विचार मांडले होते. त्यामुळे या प्रश्नाकडे ब्रिटिश शासनाचे लक्ष वेधले गेले. तसेच वाराणसीचा रेसिडेंट, डंकन, कॉर्नवालिस, शोअर, पुर हून जॉन, स्ट्रेंची यांच्या प्रयत्नामुळे ५ एप्रिल १८७४ रोजी एक विधेयक मंजूर करण्यात आले. यामुळे येथील महिला चळवळीला एक दिशा मिळाली.[१०]

**महाराष्ट्रातील महिला सबलीकरण**

महाराष्ट्र राज्य हे देशातील पुरोगामी राज्य म्हणून ओळखले जाते. या राज्यामध्ये स्त्रियांना समान दर्जा प्राप्त व्हावा आणि त्यांच्या प्रतिष्ठेचे संरक्षण व्हावे यासाठी स्वातंत्र्यपुर्व व स्वातंत्र्योत्तर काळात प्रयत्न झाल्याचे दिसुन येते. याविषयीचा थोडक्यात आढावा पुढीलप्रमाणे घेतला आहे.

**स्वातंत्र्यपुर्व काळातील महाराष्ट्रातील महिला सबलीकरण**

महाराष्ट्रात स्त्रीयांच्या सामाजिक स्थितीत सुधारणा घडवून आणण्यासाठी महात्मा जोतीराव फुले आणि त्यांच्या पत्नी सावित्रीबाई फुले यांनी इ.स.१८४८ मध्ये पुणे येथे मुलींची शाळा सुरू केली.[४] अस्पृश्य मुला-मुलींसाठी शाळा सुरू



केल्या. विधवा विवाहास प्रोत्साहन व चालना दिली. परित्यक्ता स्त्रियांना आश्रय दिला आणि सर्वसामान्य स्त्रियांच्या जीवनात सुधारणा घडवून आणण्याचा प्रयत्न केला.[११] स्त्रियांच्या दृष्टीने जोतीबा फुले भारतातल्या स्त्री-मुक्ती चळवळीचे संस्थापक होते असे मानले जाते. जूनी पितृसत्ताक कुटुंबसंस्था नष्ट करून नवीन समताधिष्ठित कुटुंबसंस्था प्रस्थापित करण्याचे प्रयत्न जोतीबा फुले यांनी अनेक वर्षापूर्वी केले होते. महात्मा जोतीराव फुले यांच्यानंतर कोल्हापूर संस्थानात राजर्षी शाहू महाराजानी महिला व मुलींच्या विकासासाठी आणि एकूणच सामाजिक परिवर्तनावर भर दिला. त्यासाठी प्रत्यक्ष कृती करून त्याची सुरूवात स्वत: पासून केली. वर्षानुवर्षे चालत आलेली आणि धर्ममान्य बनलेली बालविवाह प्रथा बंद केली. यासाठी १२ जुलै १९१९ रोजी विवाहासंबंधीचा कायदा केला. या कायद्याने मुलीचे लग्नाचे वय १४ वर्षे व मुलाचे वय १८ वर्ष असे केले.[१२] समाजातील जातीभेद संपुष्टात आणण्यासाठी आंतरजातीय विवाहाला मान्यता देणारा कायदा केला. आंतरजातीय विवाहाला कायद्याने मान्यता दिली नाही तर या कायद्याला कृतीत आणण्यासाठी स्वत: पुढाकार घेतला. १९१७ मध्ये विधवा विवाहास प्रोत्साहन देणारा कायदा केला. ११ जुलै १९१९ ला काडीमोड कायदा केला. ख्रिश्चन, पारसी समाज सोडून अन्य सर्व जाती जमातींना हा कायदा लागू केला.[१३] अनौरस संतती व जोगतिनी याविषयी १७ जानेवारी १९२० रोजी कायदा केला.[७] तत्कालीन समाजव्यवस्थेने वेगवेगळ्या कारणांनी काढून घेतलेली महिलांची प्रतिष्ठा परत देण्याचा हा अतिशय पुरोगामी प्रयत्न होता.राजर्षी शाहु महाराजांनी समाजाचा सर्वांगीण विकास करण्यासाठी स्त्रीला सबला बनविण्याचा प्रयत्न केला. स्त्री, तिचे शिक्षण, विवाह, आरोग्य, पुर्नविवाह, घटस्फोट घेण्याचे स्वातंत्र्य, अश्लिल व अनिष्ठ प्रथापासून सुटका, स्त्री स्वावलंबन इत्यादी स्तरावर त्यांनी जाणीवपूर्वक प्रयत्न केले आहे.

न्यायमुर्ती रानडे यांनी आपली पत्नी रमाबाई रानडे यांना लग्न झाल्यानंतर शिकवायला सुरूवात केली. रमाबाई रानडे यांनी नंतर पुण्यात मुलीच्या शिक्षणासाठी शाळा व इतर अनेक उपक्रम सुरू केलेत. गोपाळराव जोशी यांनी पोस्टात नोकरी करीत असतांनाच आपली पत्नी आनंदीबाई यांना शिक्षणासाठी सर्व प्रकारचे सहकार्य केले. त्यांनी अमेरिकेत वैद्यकिय शिक्षण पूर्ण केले. या महाराष्ट्रातील पहिल्या महिला डॉक्टर आहेत. गोपाळ गणेश आगरकर यांनी महिलांच्या सबलीकरणासाठी कुटुंब नियोजन, विवाह वय, शिक्षण यासंबंधी पुरोगामी व प्रगतीशील विचार मांडले व पुरस्कार केला.[१४]

१८९६ मध्ये महर्षी अण्णा केशव कर्वे यांनी पुणे येथे 'अनाथ बालिकाश्रम' या संस्थेची स्थापना केली. आज या संस्थेच्या पुणे, सातारा, वाई, रत्नागिरी या

PRINCIPAL
Shivaji College
Hingoli. Dist. Hingoli

Scanned with OKEN Scanner

५) परिवर्तन घडवून आणण्याच्या योग्यतेबाबत सकारात्मक विचार

६) वैयक्तिक आणि सामूहिक सामर्थ्यांमध्ये सुधारणा घडविण्याचे कौशल्य आत्मसात करण्याची योग्यता

७) अखंड आणि स्वपुरस्कृत विकास प्रक्रिया आणि परिवर्तनात सहभाग घेणे.

८) स्वतःची सकारात्मक प्रतिमा तयार करणे आणि नकारात्मक गोष्टींना ताबा मिळविणे.

९) लोकशाही मार्गाने इतरांचे दृष्टिकोन बदलण्याची योग्यता.[९]

**भारतातील महिला सबलीकरण**

भारतात स्त्रीमुक्ती चळवळीची सुरूवात राजा राममोहन रॉय यांच्या कार्यातून झाली. त्यांनी स्त्री-पुरूष समता, स्त्री-शिक्षण, स्त्रीयांचे हक्क यावर भर देऊन सतीप्रथेला विरोध केला व त्यांच्या प्रयत्नामुळेच ब्रिटिश सरकारने इ.स. १८२९ मध्ये सतीप्रथा बंदी कायदा केला होता.[९] राजा राममोहन रॉय यांनी बालविवाह पद्धतीस विरोध केला होता आणि विधवा विवाहाचे समर्थन केले होते. तसेच त्यांनी बहूपत्नीत्व पद्धतीला विरोध करून स्त्रीयांचा कौटुंबिक व सामाजिक दर्जा उंचावण्यासाठी प्रयत्न केले. याच काळात १८११ मध्ये एडवर्ड मुर यांनी "हिंदू इन फार्ट साइड रे", १८१५ मध्ये जॉन फास्मेकने 'अकाउंट ऑफ द अॅबॉलिशन ऑफ फिमेल इनफॅन्टिसाइड इन गुजरात' आणि १८२९ मध्ये जेम्स टॉडने 'अॅनल्स अॅंड अॅंटिक्वीटिज ऑफ राजस्थान' ही पुस्तके लिहीली आणि यामध्ये त्यांनी भारतातील लहान मुलींची हत्या व महिलांची स्थिती याविषयी गांभीर्याने विचार मांडले होते. त्यामुळे या प्रश्नाकडे ब्रिटिश शासनाचे लक्ष वेधले गेले. तसेच वाराणसीचा रेसिडेंट, डंकन, कॉर्नवालिस, शोअर, पुर हून जॉन, स्ट्रेची यांच्या प्रयत्नामुळे ५ एप्रिल १८७४ रोजी एक विधेयक मंजूर करण्यात आले. यामुळे येथील महिला चळवळीला एक दिशा मिळाली.[१०]

**महाराष्ट्रातील महिला सबलीकरण**

महाराष्ट्र राज्य हे देशातील पुरोगामी राज्य म्हणून ओळखले जाते. या राज्यामध्ये स्त्रियांना समान दर्जा प्राप्त व्हावा आणि त्यांच्या प्रतिष्ठेचे संरक्षण व्हावे यासाठी स्वातंत्र्यपुर्व व स्वातंत्र्योत्तर काळात प्रयत्न झाल्याचे दिसुन येते. याविषयीचा थोडक्यात आढावा पुढीलप्रमाणे घेतला आहे.

**स्वातंत्र्यपुर्व काळातील महाराष्ट्रातील महिला सबलीकरण**

महाराष्ट्रात स्त्रीयांच्या सामाजिक स्थितीत सुधारणा घडवून आणण्यासाठी महात्मा जोतीराव फुले आणि त्यांच्या पत्नी सावित्रीबाई फुले यांनी इ.स.१८४८ मध्ये पुणे येथे मुलींची शाळा सुरू केली.[८] अस्पृश्य मुला-मुलींसाठी शाळा सुरू केल्या. विधवा विवाहास प्रोत्साहन व चालना दिली. परित्यक्ता स्त्रियांना आश्रय दिला आणि सर्वसामान्य स्त्रियांच्या जीवनात सुधारणा घडवून आणण्याचा प्रयत्न केला.[११] स्त्रियांच्या दृष्टीने जोतीबा फुले भारतातल्या स्त्री-मुक्ती चळवळीचे संस्थापक होते असे मानले जाते. जुनी पितृसत्ताक कुटुंबसंस्था नष्ट करून स्त्रीप समताधिष्ठित कुटुंबसंस्था प्रस्थापित करण्याचे प्रयत्न जोतीबा फुले यांनी अनेक वर्षापूर्वी केले होते. महात्मा जोतीराव फुले यांच्यानंतर कोल्हापूर संस्थान राजर्षी शाहू महाराजांनी महिला व मुलींच्या विकासासाठी आणि एकूणच सामाजिक परिवर्तनावर भर दिला. त्यासाठी प्रत्यक्ष कृती करून त्याची सुरूवात स्वतः पासून केली. वर्षानुवर्षे चालत आलेली आणि धर्ममान्य बनलेली बालविवाह प्रथा बंद केली. यासाठी १२ जुलै १९१९ रोजी विवाहासंबंधीचा कायदा केला. या कायद्याने मुलीचे लग्नाचे वय १४ वर्षे व मुलाचे वय १८ वर्षे असे केले.[१२] समाजातील जातीभेद संपुष्टात आणण्यासाठी आंतरजातीय विवाहाला मान्यता देणारा कायदा केला. आंतरजातीय विवाहाला कायद्याने मान्यता दिली नाही तर या कायद्याला कृतीत आणण्यासाठी स्वतः पुढाकार घेतला. १९१७ मध्ये विधवा विवाहास प्रोत्साहन देणारा कायदा केला. ११ जुलै १९१९ ला काडीमोड कायदा केला. ख्रिश्चन, पारसी समाज सोडून अन्य सर्व जाती जमातींना हा कायदा लागू केला.[१३] अनौरस संतती व जोगतिनी याविषयी १७ जानेवारी १९२० रोजी कायदा केला.[१४] तत्कालीन समाजव्यवस्थेने वेगवेगळ्या कारणांनी काढून घेतलेली महिलांची प्रतिष्ठा परत देण्याचा हा अतिशय पुरोगामी प्रयत्न होता.राजर्षी शाहु महाराजांनी समाजाचा सर्वांगीण विकास करण्यासाठी स्त्रीला सबला बनविण्याचा प्रयत्न केला. स्त्री, तिचे शिक्षण, विवाह, आरोग्य, पुर्नविवाह, घटस्फोट घेण्याचे स्वातंत्र्य, अश्लिल व अनिष्ट प्रथापासुन सुटका, स्त्री स्वावलंबन इत्यादी स्तरावर त्यांनी जाणीवपूर्वक प्रयत्न केले आहे.

न्यायमुर्ती रानडे यांनी आपली पत्नी रमाबाई रानडे यांना लग्न झाल्यानंतर शिकवायला सुरूवात केली. रमाबाई रानडे यांनी नंतर पुण्यात मुलींच्या शिक्षणासाठी शाळा व इतर अनेक उपक्रम सुरू केलेत. गोपाळराव जोशी यांनी पोस्टात नोकरी करीत असतांनाच आपली पत्नी आनंदीबाई यांना शिक्षणासाठी सर्व प्रकारचे सहकार्य केले. त्यांनी अमेरिकेत वैद्यकिय शिक्षण पूर्ण केले. या महाराष्ट्रातील पहिल्या महिला डॉक्टर आहेत. गोपाळ गणेश आगरकर यांनी महिलांच्या सबलीकरणासाठी कुटुंब नियोजन, विवाह वय, शिक्षण यासंबंधी पुरोगामी व प्रगतीशील विचार मांडले व पुरस्कार केला.[१४]

१८९६ मध्ये महर्षी अण्णा केशव कर्वे यांनी पुणे येथे 'अनाथ बालिकाश्रम' या संस्थेची स्थापना केली. आज या संस्थेच्या पुणे, सातारा, वाई, रत्नागिरी या





PRINCIPAL
Shivaji College
Hingoli. Dist. Hingoli

Scanned with OKEN Scanner

परिसरात शैक्षणिक शाखा आहेत आणि त्यात हजारो विद्यार्थिनी शिक्षण घेत आहेत. महर्षी कर्वे नेहमी म्हणत असत, "स्त्री शिक्षणाच्या कार्याची लांबी, रुंदी, खोली वाढविण्याच्या मदत कार्यासाठी मी आपले जीवन अर्पण करीन, अशी आपल्या मनाची तयारी असली पाहिजे. या कार्यासाठी पुन्हा जन्म घेऊन यावे अशी माझी इच्छा आहे."[१५]

१९१५ मध्ये जपानमधील स्त्रियांच्या विद्यापीठाची माहिती देणाऱ्या एका पुस्तिकेच्या प्रेरणेने त्यांनी १९१६ मध्ये मुंबई येथे महिला विद्यापीठाची स्थापना केली. श्रीयूत ठाकरसी यांच्या देणगीतून विद्यापीठ उभे राहिल्याने या विद्यापीठास 'श्रीमती नाथीबाई दामोधर ठाकरसी महिला विद्यापीठ' असे नाव देण्यात आले. केवळ स्त्रियांसाठी असणारे हे पहिले विद्यापीठ आहे.[१६] हे विद्यापीठ प्रामुख्याने स्त्रियांकडून चालवले जात असे व येथे स्त्रियांच्या सोयीसाठी मातृभाषेतून शिक्षण देण्याची व्यवस्था होती. गृहशास्त्र, वनस्पती शास्त्र, आरोग्यशास्त्र यासारखे विषय या विद्यापीठामध्ये सक्तीचे होते.

पंडीता रमाबाई ह्या स्त्री उद्धाराचे कार्य करीत होत्या. त्यांनी १८८२ मध्ये आर्य महिला मंडळाची स्थापना करून संपूर्ण भारतातील स्त्रीयांची अंधश्रद्धेतून होणाऱ्या अन्यायातून सुटका करण्यासाठी प्रयत्न सुरू केले. यासाठी संपूर्ण महाराष्ट्रभर दौरे काढून सोलापूर, बार्शी, पंढरपूर, नगर, ठाणे इत्यादी ठिकाणी आर्य महिला समाजाच्या शाखाची स्थापना केली. स्त्री उद्धाराचे कार्य करत असतानांच त्यांनी धर्मचिकित्सा केली आणि १८८३ मध्ये ख्रिश्चन धर्माचा स्वीकार केला. ११ मार्च १८८९ मध्ये त्यांनी शारदासदनची स्थापना केली. विधवासाठी सुरू झालेल्या या शाळेतील विद्यार्थीनी आनंदीबाई जोशी ही पुढे बाया कर्वे म्हणजे महर्षी कर्वे यांच्या पत्नी बनल्या. शारदासदनचा भर महिलांना वाचन, लेखन, गणित, इतिहास, भूगोल, विणकाम, भरतकाम देऊन स्वावलंबी बनवणे यावर होता. स्त्रियांनी घराच्या बाहेर पडून धीटपणे पुरूष समुदायात वावरण्याची सवय लावणे, बाहेरच्या जगाचा परिचय घडवून देणे, त्यांच्यात आत्मविश्वास व व्यापक दृष्टी निर्माण करणे असे कार्य रमाबाईने केले. याच दरम्यान पुणे येथे प्लेगची साथ सुरू झाल्याने बाहेरून रूग्णांना पुण्यात आणण्यास सरकारने बंदी घातल्याने रमाबाईनी पुण्यापासून ३५ मैल दूर अंतरावर केडगाव येथे परप्रांतीय स्त्रियांना नेले. केडगावच्या १०० एकराच्या माळरानावर त्यांनी मुक्तीसदन ची स्थापना केली. पुणे येथील शारदासदन केडगाव येथे आणले.१७ या आश्रमात रमाबाई यांनी पुरूषाशिवाय आपण सन्मानाने जगू शकतो असा आत्मविश्वास महिलामध्ये निर्माण केला. पुढे कृपासदन, प्रितीसदन, बार्तमी सदन व सदानंद सदनची स्थापना करून समाजातील दीनदुबळ्या स्त्रीयांच्या उद्धारासाठी कार्य केले. त्यांचे हे कार्य तत्कालीन समाजाच्या



पार्श्वभूमीवर महत्वाचे आहे. स्त्री उद्धाराचे प्रयत्न भारतात स्वातंत्र्यपुर्वकाळात सातत्याने होत आले आहेत. महात्मा फुले यांची स्वप्ने शाहु महाराजांनी आपल्या संस्थांनात साकारली. शाहु महाराजांना संस्थानाबाहेर जे करणे सहज शक्य नव्हते ते पुर्ण करण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी 'हिंदू कोड बिल' संसदेत मांडून महिलांच्या हक्काविषयी प्रयत्न केले. हिंदू कोड बिल म्हणजे देशातील समस्त महिलांचेच नव्हे तर फुले आणि शाहू महाराजाचे स्वप्न होते. भारतीय संविधानातील स्वातंत्र्य आणि समता या दोन्ही उद्दिष्टांना भारतातील जाती व्यवस्थाअंत आणि स्त्री पुरूष समानतेशिवाय अर्थ नव्हता. यामुळे 'हिंदू कोड' मध्ये सुधारणा होणे आवश्यक होते. परंतु सनातनी सामाजिक मानसिकतेमुळे 'हिंदू कोड बील' संमत होऊ शकले नाही.[१२] मात्र पुढे हळूहळू हिंदू कोड बिलातील सर्व तरतुदी स्वतंत्र कायदे करून स्विकारण्यात आल्या आहेत.

**महिला सबलीकरणाचा उद्देश**

महिला सबलीकरण चळवळीचे हे मुख्य उद्दिष्ट असून त्याशिवाय महिलाचे सबलीकरण साध्य होऊ शकणार नाही. पुरूष प्रधान संस्कृतीमधील लिंगभेदावर आधारीत महिलांच्या शोषणाची प्रक्रिया नष्ट करून स्त्री-पुरुष समानतेवर आधारित व्यवस्था निर्माण करण्यासाठी स्त्रीवादी संघटना सक्रिय आहेत. स्त्रियांना पुरूषांच्या बरोबरीने विकासाच्या, प्रगतीच्या समान संधी, समान दर्जा, सत्तेत महत्वाचा वाटा उपलब्ध करून देणारी व्यवस्था निर्माण करणे हे सबलीकरणाचे प्रमुख उद्दिष्ट आहे. भारतात प्राचीन काळापसून स्त्रियांवर अन्याय होत आलेले आहेत. आर्थिक, सामाजिक व राजकीय अधिकारापासून वंचित असल्याने स्त्रियांच्या बुद्धीमत्तेचा, कार्यक्षमतेचा विकास होऊ शकला नाही. स्त्रियांना आर्थिक व सामाजिक अधिकार मिळवून देऊन त्यांचा विकास साधने हे महिला सबलीकरण प्रक्रियेचे दुसरे महत्वाचे उद्दिष्ट आहे. आर्थिक आणि सामाजिक न्यायावर आधारित समाजव्यवस्थेची निर्मिती करणे महिला सबलीकरणाच्या प्रक्रियेत अभिप्रेत आहे.

**सांराश**

महिला सबलीकरणाची प्रक्रिया ही विसाव्या शतकात गतिमान बनली असली तरी या प्रक्रियेची सुरूवात काही शतकापूर्वी झाली आहे. अमेरिकन स्वातंत्र्याचा जाहीरनामा आणि फ्रेंच व्यक्तिस्वातंत्र्याचा जाहीरनामा यामध्ये महिला सबलीकरण प्रक्रियेचे पहिले प्रतिबिंब पडल्याचे दिसते. या दोन्ही जाहीरनाम्यामध्ये स्त्री आणि पुरूषासाठी समान अधिकाराची तरतूद करण्यात आली आहे. १८ व्या शतकामध्ये साहित्यकृती मधून महिला अधिकाराचा पुरस्कार केला. एकोणिसाव्या शतकामध्ये कॅंडी स्टॅनहोन, विल्यम थॉम्पसन, हॅरियट टेलर, जॉन स्टूअर्ट मिल यासारख्या साहित्यिकांनी, विचारवंतानी स्त्री मुक्तीचा विचार तत्कालीन



PRINCIPAL
Shivaji College
Hingoli. Dist. Hingoli

Scanned with OKEN Scanner

समाजामध्ये रूजवण्याचा प्रयत्न केला.

भारतामध्ये १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात आणि २० व्या शतकाच्या प्रारंभी महात्मा जोतीबा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, न्यायमूर्ती रानडे, गोपाळ गणेश आगरकर, महर्षी धोंडो केशव कर्वे आदी समाजसुधारकांनी स्त्रियांच्या गुलामगिरीविरूद्ध आवाज उठवून महिलांना पुरूषाच्या बरोबरीने सर्वच क्षेत्रामध्ये समान अधिकाराची मागणी केली आहे.

स्वातंत्र्योत्तर काळात महिला सबलीकरणाचे प्रयत्न होत आहेत. समाजाचा एक महत्वाचा घटक असलेल्या महिलांचा आर्थिक विकासाबरोबर सामाजिक विकास घडवून आणणे, त्या नात्यांचे हक्क व जबाबदारी याची जाणीव करून देणे, त्यांना नियोजन व निर्णयप्रक्रियेत सहभागी करून घेणे, भारताच्या लोकतंत्र पद्धतीत त्यांना भागीदारी देणे म्हणजे खऱ्या अर्थाने महिलांचे सबलीकरण होय. सामाजिक, आर्थिक, राजकीय आणि सांस्कृतिक क्षेत्रात याविषयी सातत्याने उपाययोजना केल्या जात आहे. त्यातून सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक व राजकीय क्षेत्रातील महिलांचे सबलीकरण होत आहे.

संदर्भ ग्रंथ :-


१. देवळाणकर शैलेंद्र, समकालीन जागतिक राजकारण, विद्या बुक पब्लिशर्स, औरंगाबाद, सुधारित दूसरी आवृत्ती, मार्च २०१०, पृ.क्र.३४२

२. महाजन सुमित्रा, स्त्री सबलीकरण तत्वज्ञान, ध्येय आणि उद्दिष्टपुर्ती योजना, वर्ष २९, ऑगस्ट २००१, पृ.क्र.२

३. डॉ.देसले किरण जी., स्पर्धा परीक्षा अर्थशास्त्र २, आर्थिक व सामाजिक विकास, दीपस्तंभ प्रकाशन, जळगाव, प्रथम आवृत्ती, २०१३, पृ.क्र.४०

४. डॉ.शिंदे ज.रा., डॉ.अमृतकर प्रशांत, समकालीन जागतिक राजकारणातील प्रमुख समस्या, चिन्मय प्रकाशन औरंगाबाद, प्रथमावृत्ती, पृ.क्र.१२९

५. डॉ.शिंदे ज.रा., डॉ.अमृतकर प्रशांत, समकालीन जागतिक राजकारणातील प्रमुख समस्या, चिन्मय प्रकाशन औरंगाबाद, प्रथमावृत्ती, पृ.क्र.१२९

६. Gangarde K.D., Gandhi and Empowerment of Women Milo to go in Pramila Kapur (Ed) Emowering the Indian Women 2001, Pub Dir. Ministry of Information Broadcasting Gove. of India, New Delhi P.1

७. Chatterji Jyotsna, Empowerment of Women Victory of Trafficking and Prostitution: A Case Study P. 169-170

८. Nath Kamala and Milly chatterje, 1996, Why Women? What Politics? Centre for Social Research, New Delhi P. 4

९. Government of India Fourth World Conference of Women Beijing 1995, Development Ministry of Human Resource and Development, New Delhi, 1995

१०. देवळाणकर,शैलेंद्र., (२०१०), समकालीन जागतिक राजकारण, औरंगाबाद, विद्या बुक पब्लिशर्स, सुधारित दूसरी आवृत्ती, ३४२

११. कीर, धनंजय., (१९९५), महात्मा फुले समग्र वाङ्मय, महाराष्ट शासन, मुंबई,५१९

१२. कांबळे,उत्तम.,(२००३),राजर्षी शाहू महाराज आणि महिला मुक्ती, पुणे, सुगावा प्रकाशन, ३०,

१३. पवार डॉ.जयसिंगराव. भाऊसाहेब., (संपादक), (२००७) राजर्षी शाहू महाराज स्मारक ग्रंथ, कोल्हापूर, महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी, द्वितीय आवृत्ती, १०२४

१४) पवार डॉ.जयसिंगराव. भाऊसाहेब., (संपादक), (२००७) राजर्षी शाहू महाराज स्मारक ग्रंथ, कोल्हापूर, महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी, द्वितीय आवृत्ती, १०२४

१५) आपटे, ज.श., (२००१) महाराष्ट्रातील स्त्री विकासाची वाटचाल, योजना, ५३

१६) प्रा.सुनिता., खडसे प्रा.संतोष, ऐतिहासिक परिप्रेक्ष्यातील स्त्रिया, पुणे, शुभम पब्लिकेशन,४३

१७) अहलूवालिया, हरजित.,(२००१) आर्थिक स्वातंत्र्याकडे वाटचाल,योजना,वर्ष २९, १२

१८) खैरमोडे, चांगदेव. भगवानराव., (२०१२) डॉ.आंबेडकर आणि हिंदू कोड बिल, पुणे, सुगावा प्रकाशन,११

१९) भारताचे संविधान, भारत सरकार विधी व न्याय कंपनी कार्य मंत्रालय, महाराष्ट्र राज्य भाषा संचालनालयाद्वारे अनुवादित आणि संचालक शासनमुद्रण, लेखनसामुग्री महाराष्ट्र राज्य, सहावी आवृत्ती (पुर्नमुद्रण) २००७, ६



PRINCIPAL
Shivaji College
Dist. Hingoli